## ॥ श्री ॥
## ॥ बाबा ॥

बाबा जयजयकार बोला बाबा जयजयकार
बाबांना जे शरण येती हो । त्यांसी मिळे आधार॥धृ॥

बाबा जयजयकार बोला बाबा जयजयकार
बाबा कर्ता बाबा धर्ता । बाबा माता बाबाची पिता
वांगणीस हो येऊन जाता । स्वप्ने होती साकार॥1॥

बाबा जयजयकार बोला बाबा जयजयकार
काया वाचा अन् मन अर्पूनी बाबा बाबा सतत बोलूनी
बाबांचे ते नाम घेता भवसागर व्हा पार ॥2॥

बाबा जयजयकार बोला बाबा जयजयकार
राजा किंवा असो भिकारी साधु किंवा असो शिकारी
बाबांच्या दरबारी सगळे होती एकाकार ॥3॥

बाबा जयजयकार बोला बाबा जयजयकार
घेऊनी चिंता दुःखे भारी येती जे बाबांच्या दारी
बाबांचरणी लीन होऊनी सुखावती ते फार ॥4॥

बाबा जयजयकार बोला बाबा जयजयकार
बाबा चरणी येऊनी बसता होई क्षुधा तृषेची शमता
म्हमदे समदे वांगणी नगरी परतती वारंवार ॥5॥

बाबा जयजयकार बोला बाबा जयजयकार
आपुली आपुली कामे करता बाबा बाबा चित्ती धरता
बोधामृत जे प्राशन करता हरती सर्व विकार ॥6॥

बाबा जयजयकार बोला बाबा जयजयकार
नाम प्रभूचे सदा जपावे बाबा मनी ते सदा असावे
कर्तव्ये ती पार पाडूनी करा सफल संसार ॥7॥

बाबा जयजयकार बोला बाबा जयजयकार
बाबांचरणी सर्व अर्पूनी बाबा चित्ती सदा स्मरोनी
जन्माचे ते सार्थक होऊनी होईल हो उध्दार ॥8॥

बाबा जयजयकार बोला बाबा जयजयकार

★★★★★